# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील विविध नद्यांमधील गाळ काढण्याचे काम नि:शुल्क करुन देण्याबाबत**

**(१) ४१११०५ (२०-०४-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध नद्यांमधील गाळ काढण्याचे काम नि:शुल्क करुन त्या मोबदल्यात उपसलेली वाळू राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकामासाठी वापरायची असा प्रस्ताव केंद्राच्या भूपृष्ठ वाहतूक मंत्रालयाने राज्यापुढे ठेवल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत राज्य शासनाने केंद्राबरोबर करार करणार आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार राज्यातील कोणकोणत्या नद्यातील गाळ काढण्याचा प्रस्ताव आहे,

(४) असल्यास, नद्यातून निघणाऱ्या वाळूचा वापर हा राज्यातील महामार्ग बांधकामासाठीच केला जाणार आहे काय,

(५) असल्यास, सदर कामांना प्रत्यक्षात कधीपासून सुरुवात केली जाणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२४-०१-२०१८) :** (१) होय, सदर प्रस्तावामध्ये जलसंधारण कामाकरीता माती, मुरुम व दगड वाहून नेण्याबाबत धोरण तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून वाळु राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकामासाठी वापरणे बाबतची बाब सदर प्रस्तावामध्ये नाही.

(२) जलसंधारण कामाशी संबंधीत अंमलबजावणी यंत्रणेने संबंधित शेतकरी तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI)/राष्ट्रीय महामार्ग व पायाभूत सुविधा विकास महामंडळ (NHIDCL)/सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यासोबत सामंजस्य करार करावयाचा आहे.

(३) याबाबत अशा महामार्गाच्या लगत असलेल्या स्थळा मधील गाळ काढण्याचे प्रस्तावित असून स्थळांची निवड संबंधीत ठेकेदार यांनी करावयाची आहे.

(४) वाळूचा उपसा करण्याचा प्रस्ताव नाही.

(५) धोरणास दि.२९ नोव्हेंबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता प्राप्त झाली असून त्यानुषंगाने कामांना प्रत्यक्षात सुरुवात करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील कॅन्सर इन्स्टिट्यूटच्या प्रस्तावाबाबत**

**(२) ६५५०६ (२७-०१-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वैद्यकीय शिक्षण विभागाकडून गेल्या चार वर्षात तब्बल सात वेळा प्रस्ताव मागविण्यात आलेला आहे त्यासंदर्भाने मुंबईतस्थित कॅन्सर इन्स्टिटयूटवरील पॉवर पॉईट प्रेझेन्टेशन होउन देखील कॅन्सर इट इन्स्टिटयूटच्या उभारणीवर काहीच कृती करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्ताव सहा वेळा पाठविल्यानंतर सन २०१५ मध्ये केवळ ४५ कोटीच्या कॅन्सर टर्शरी युनिटला मंजुरी देण्यात आली, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, रेडिओथेरेपी विभागप्रमुख डॉ. अशोक दिवाण यांनी १२० कोटीचा प्रस्ताव सादर केला असून शासनाचे या प्रस्तावाकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, माहे सप्टेंबर ते ऑक्टोंबर २०१६ वैद्यकीय विभागाकडून निधी उपलब्ध होणेकरीता शासनस्तरावर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने कॅन्सर इन्स्टिटयुटचा संदर्भाने तात्काळ कार्यवाही केली आहे काय नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.
केंद्र शासनाच्या अर्थसहाय्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रुग्णालय, औरंगाबाद येथे “राज्यस्तरीय कर्करोग संस्था” स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सदर कर्करोग संस्थेप्रमाणेच कर्करोग उपचाराच्या अत्याधुनिक सोयीसुविधा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे कर्करोग उपचाराच्या अत्याधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(४) दिनांक २७.०९.२०१६ रोजी आयोजित बैठकीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे कर्करोग उपचाराच्या अत्याधुनिक सोयी-सुविधा निर्माण करण्याबाबतचा विषय बैठकीच्या विषयसूचीत समाविष्ट होता.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये जन्म व मृत्यू नोंदीकरिता मुदतवाढ देण्याबाबत**

**(३) ६६५०९ (०५-०१-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये जन्म व मृत्यू नोंदी करिता एक वर्षाची मुदत देण्यात आली असून एक वर्षानंतर न्यायालयात जाऊन नोंदी करून घ्यावा लागत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळले आले आहे,

(३) असल्यास, तद्नुसार ग्रामीण भागातील जनतेची गैरसोय टाळण्यासाठी पाच वर्षापर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थानाच जन्म व मृत्यूच्या नोंदी करण्याचा अधिकार देऊन मुदतवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२८-१२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी नियम २०००, नियम ९(३) मधील तरतूदीनुसार जर एखादी जन्म अथवा मृत्युची घटना घडल्यापासून एक वर्षाच्या आत नोंदणी झाली नसेल तर त्या कार्यक्षेत्रातील कार्यकारी दंडाधिकारी यांच्या आदेशाने नोंदणी करता येते.

(२), (३) व (४) केंद्रीय जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ च्या कलम १३ आणि महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी नियम २००० च्या नियम ९ मधील वैधानिक तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येत असल्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे उपलाट (ता.तलासरी, जि.पालघर) येथील आदिवासी शेतकऱ्यांच्या भात शेती व शेकडो वृक्षांची अवैधरीत्या तोड केल्याबाबत**

**(४) ६६८०० (०५-०१-२०१७). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उपलाट (ता.तलासरी, जि.पालघर) येथे खाजगी कंपनीच्या पाईपलाईन टाकण्यासाठी वन हक्क समितीची परवानगी न घेता परस्पर आदिवासी शेतकऱ्यांची भात शेती उध्वस्त करुन शेकडो वृक्षांची अवैद्यरित्या तोड केल्याचे दिनांक २९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील उपलाट गांव हे पेसा अंतर्गत असल्यामुळे ग्रामसभेला विशेष महत्व आहे, पाईपलाईन शेतकऱ्यांच्या शेतातून जात असल्यामुळे जमिनी व वृक्षांचे पंचनामे करुन नुकसान भरपाई देवून वृक्ष तोड करा असे ग्रामपंचायत व वन हक्क समितीने

दिनांक १५ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास वन विभाग, बोर्डी यांना लेखी पत्र दिले तरीही अधिकाऱ्यांनी आदिवासी शेतकऱ्यांची भात शेती उध्वस्त करुन वृक्ष तोड केल्यामुळे ग्रामस्थांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषीं अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

मौजे उपलाट (ता.तलासरी, जि.पालघर) येथे खाजगी कंपनीच्या पाईपलाईन टाकण्यासाठी वन हक्क समितीची परवानगी न घेता परस्पर आदिवासी शेतकऱ्यांची भातशेती उध्वस्त करुन शेकडो वृक्षांची अवैधरित्या तोड केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

याबाबत ग्रामपंचायत व वनहक्क समितीने वनक्षेत्रपाल, बोर्डी यांचे कार्यालयास कोणतेही लेखी पत्र दिलेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**करमाळा (जि.सोलापूर) येथील जलयुक्त शिवार योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(५) ६७०२६ (१६-१२-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) येथे जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत झालेल्या बांदबंदिस्ताच्या कामाचे अस्तरीकरण न झाल्यामुळे, पडलेल्या पावसाने माती वाहून खड्ड्यात पडल्याने मातीने खड्डे भरल्यामुळे या कामावर खर्च केलेले १३ कोटी रुपये व्यर्थ गेल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अस्तरीकरण न करणाऱ्या ठेकेदाराची देयके काढणाऱ्या कृषी अधिकाऱ्यांवर तसेच ठेकेदारांवर कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित ठेकेदार व कृषी अधिकारी यांच्यावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**प्रा. राम शिंदे (०७-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे भरतपूर (ता.बाळापुर, जि.अकोला) येथील कोल्हापुरी बंधाऱ्याचे सिमेंटचे बांधकाम जेसीबी यंत्राद्‌वारे तोडल्याबाबत**

**(६) ७१२७३ (१६-१२-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे भरतपूर (ता.बाळापुर, जि.अकोला) येथील कोल्हापुरी बंधाऱ्याचे सिमेंटचे बांधकाम जेसीबी यंत्राद्‌वारे तोडल्यामुळे दिनांक २१ जून, २०१६ रोजी लोकप्रतिनिधीनी मा.जलसंधारण मंत्री यांचेकडे लेखी पत्राद्‌वारे चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०८-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) या पुर्वी सदर प्रकरणी लघु सिंचन विभाग जिल्हा परिषद अकोला व लघु सिंचन (जलसंधारण) विभाग अकोला यांचे प्रतिनीधी द्‌वारे दिनांक १३/७/२०१६ रोजी संयुक्त पहाणी करून पंचनामा करण्यात आला होता. तसेच जिल्हाधिकारी अकोला यांचे निर्देशानुसार माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये लघु सिंचन विभागातील दोन उपअभियंता द्‌वारे संयुक्त पहाणी करून अहवाल सादर करण्यात आला आहे. बंधारा तोडणाऱ्या इसमावर कारवाई करण्याबाबत ग्राम पंचायत भरतपुर यांना निर्देश देण्याच्या सुचना जिल्हाधिकारी अकोला यांना देण्यात आल्या आहेत. सदर गावाचा समावेश जलयुक्त शिवार अभियान सन २०१७-१८ मध्ये करण्यात आला असुन त्या अंतर्गत दगडी बंधाऱ्याची दुरुस्ती प्रस्तावीत आहे.

---

**धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेंतर्गत पूर्ण झालेल्या कामांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(७) ७१८६५ (१६-१२-२०१६). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेंतर्गत सन २०१५-२०१६ मध्ये पूर्ण झालेल्या कामांना निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भातील मागणीचे एक निवेदन अध्यक्ष धुळे जिल्हा कॉन्ट्रक्टर असोसिएशनने मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ५ ऑक्टोबर २०१६ रोजी सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यातील जलयुक्त शिवार योजनेंतर्गत सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षातील कामे मुदतीत पूर्ण करून कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, धुळे यांच्याकडे देयके संबंधित ठेकेदारांनी सादर केली असतानाही सदरहू कामाची देयके संबंधित ठेकेदारांना आजमितीस अदा करण्यात आलेली होती, हेही खरे आहे काय

(३) असल्यास, सदरहू योजनेंसाठी तरतूद करण्यात आलेला अनुक्रमे १३७ लक्ष व ११३ लक्ष वर्षा अखेरीस शासनाकडे परत केल्यामुळे तो निधी पुन्हा मिळावा यासाठी अधिक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, नाशिक यांनी दिनांक ३१ मे २०१६ रोजी सचिव ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय यांचेकडे प्रस्ताव पाठवून मागणीही केलेली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, ठेकेदाराचा कोणताही दोष नसताना केवळ संबंधित अधिकाऱ्यांच्या गैरकारभारामुळे अद्यापी ठेकेदारांना केलेल्या कामाची देयके ठेकेदारांना विनाविलंब अदा होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे ?

**प्रा. राम शिंदे (१६-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दि.३१/३/२०१६ अखेर ठेकेदारांची बिले अदा करण्यात आलेली नव्हती. तथापि, जलसंधारण विभाग शासन निर्णय दि.२८/१०/२०१६ नूसार वितरीत केलेल्या निधीमधून ठेकेदारांची बिले अदा करण्यात आलेली आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) अधिक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, नाशिक यांचे मागणीच्या अनुषंगाने जलसंधारण विभाग शासन निर्णय दि.२८/१०/२०१६ नूसार धुळे व नंदूरबार जिल्हयास अनुक्रमे रू. १३७.२७ लक्ष व ११३.२५ लक्ष असा एकूण रू.२५०.५२ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यानूसार संबंधित ठेकेदारांना कामांची देयके प्राथम्य क्रमाने अदा करण्यात आलेली आहेत.

---

## केंद्रशासनाने संमत केलेला क्लिनीकल एस्टॅब्लिशमेंट अ‍ॅक्ट २०१० महाराष्ट्रात तातडीने लागू करण्याबाबत

**(८) ७७०७८ (१८-०४-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), अ‍ॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुग्णांच्या हितासाठी केंद्र शासनाने क्लिनीकल एस्टॅब्लिशमेंट अ‍ॅक्ट २०१० हा कायदा मंजूर त्याच्या अंमलबजावणीचे अधिकार देशातील प्रत्येक राज्य सरकारला दिले आहेत, कर्नाटकसह अनेक राज्यांनी तो कायदा त्यांच्या राज्यात अंमलात आणला आहे, मात्र महाराष्ट्र शासनाने गेली ६ वर्षे झाली, तरी हा कायदा राज्यात लागू केलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक डॉक्टर्स, पत्रकार, समाजसेवक, साथी ही वैद्यकीय संघटना, लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे हा कायदा महाराष्ट्रात लागू करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात हिंदु जनजागृती समिती आणि मा.विधानसभा सदस्य बाळासाहेब मुरकुटे यांनी यांनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये मा.मुख्यमंत्री, तसेच मा.आरोग्यमंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन उक्त कायदा कधीपासून राज्यात लागू करणार आहे,

(५) तसेच कायदा लागू करण्यापूर्वी या कायद्याच्या प्रस्तावनेत हा कायदा रूग्णांना किफायतशीर व वाजवीदरात, असा उल्लेख नमूद करण्याची मागणी अनेक संघटनांनी केली, त्याचा शासन विचार करणार आहे काय ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

काही समाजसेवक व लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे तशी मागणी केली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात विशेषत: पालघर तालुक्यात आदिवासी क्षेत्रातील बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(९) ७७२९७ (१८-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पालघर तालुक्यात आदिवासी क्षेत्रातील जिल्ह्यात कुपोषण आणि बाल मृत्युचे प्रमाण वाढत असताना बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने या पदासाठी परीक्षा घेवून १४७ उमेदवारांची निवड केलेली असून गेल्या चार महिन्यापासून त्यांना नियुक्तीच देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांनी संबंधीत पदे १५ दिवसात भरण्याचे आश्वासीत केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०१-२०१८) :** (१) होय
(२), (३) व (४) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दिनांक १२.६.२०१७ अन्वये सरळसेवेच्या कोटयातील १४५ गट-ब संवर्गातील अधिका-यांची नवनियुक्तीने पदस्थापनेचे आदेश देण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील प्रकल्प अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांबाबत**

**(१०) ७७९५७ (१८-०४-२०१७). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: रायगड जिल्हयातील अंगणवाड्यांवर तसेच आश्रमशाळेवर देखरेख ठेवण्यासाठी विभाग पातळीवर पर्यवेक्षक व तालुकास्तरावर प्रकल्प अधिकारी शासन नेमणूक करते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्हयातील १७ प्रकल्पांवर केवळ चारच प्रकल्प अधिकारी काम पहात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हयातील प्रकल्प अधिकाऱ्यांची रिक्त पदे असल्याने कुपोषण निर्मुलनातील कार्याला अडथळा ठरत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.

रायगड जिल्हयातील १७ प्रकल्पांपैकी ८ प्रकल्पावर नियमित अधिकारी कार्यरत असून ९ प्रकल्पावरील पदे रिक्त आहेत. तथापि सदर रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार इतर सक्षम अधिकारी/कर्मचारी यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे.
(३) नाही.

रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार शासन निर्णय दि. २८.७.२०१६ मधील मार्गदर्शक सुचनेनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांचेमार्फत सक्षम प्राधिका-याकडे देण्यात आलेला आहे. त्यामुळे रिक्त पदे असल्याने कुपोषण निर्मुलनातील कार्याला अडथळा ठरत आहे, असे म्हणणे संयुक्तीक नाही.
(४) गट-ब संवर्गाच्या सरळसेवेच्या कोटयातील १४५ पदे माहे जून, २०१७ मध्ये भरण्यात आलेले आहेत. त्याच बरोबर सरळसेवेच्या कोटयातील ५ रिक्त पदे भरणेबाबतचे मागणीपत्र शासनास सादर करण्यात आले असून सदरची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा

आयोगामार्फत कार्यवाही सुरु आहे. तसेच पदोन्नती कोटयातील रिक्त पदे भरणेबाबतची बिंदूनामावली प्रमाणित करुन मिळण्यासाठी मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त,पुणे कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेलोरी (ता.पुसद, जि.यवतमाळ) प्राथमिक आरोग्य केंद्रात कुटूंब कल्याण शस्त्रक्रियेत एका महिलेचा झालेला मृत्यू**

**(११) ७९८५१ (१८-०४-२०१७). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेलोरी (ता.पुसद, जि.यवतमाळ) प्राथमिक आरोग्य केंद्रातील कुटूंब कल्याण शिबीरात एका महिलेचा मृत्यू व दोन महिलांची प्रकृती गंभीर असल्याची माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिबीरातील शस्त्रक्रिया करणाऱ्या वैदयकीय अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार दोषी वैदयकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२७-१२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) चौकशी समितीच्या अहवालानुसार दोषी आढळलेल्या संबंधित वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, बेलुरा, ता.पुसद व तालुका आरोग्य अधिकारी, डिग्रस यांना शासन आदेश दि.०६.०६.२०१७ अन्वये निलंबित करण्यात आलेले आहे. तसेच कर्तव्यात कसूर करणाऱ्या दोन आरोग्य सेविकांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरळी, मुंबई रा.का.वि.यो. रुग्णालयात अतिदक्षता विभाग करण्यासाठी निधी उपलब्ध होण्याबाबत**

**(१२) ८१३८४ (१८-०४-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरळी, मुंबई रा.का.वि.यो. रुग्णालयात अतिदक्षता विभाग (आय.सी.यु.) स्थापित करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडून निधी मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने वरळी, मुंबई रा.का.वि.यो. रुग्णालयात अतिदक्षता विभाग (आय.सी.यु.) स्थापित करण्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) जिल्हा नियोजन समिती मार्फत निधी उपलब्ध न झाल्यामुळे राकावियो रुग्णालय, वरळी येथे अतिदक्षता विभाग (आय.सी.यु.) स्थापित करता यावे याकरीता वैद्यकीय अधिक्षक, राकावियो रुग्णालय, वरळी यांनी कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई, सार्वजनिक बांधकाम विभाग, वरळी मुंबई यांना सुधारीत अंदाजपत्रक सादर करण्यास कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गोमघर (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील आदिवासींच्या आरोग्याबाबत

**(१३) ८१४९७ (१८-०४-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोमघर (ता.मोखाडा, जि.पालघर) येथे आदिवासींच्या आरोग्याचा प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ५६ लक्ष रुपये खर्च करुन बांधलेल्या आरोग्य उपकेंद्राची इमारत मागील २ वर्षापासून कर्मचाऱ्यांची पदनिर्मिती न झाल्याने तेथे रुग्णसेवेस अद्याप सुरुवात न झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे आरोग्य उपकेंद्र तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२३-११-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सदर आरोग्य उपकेंद्राचे बांधकाम जानेवारी २०१७ मध्ये पूर्ण झालेले आहे. या उपकेंद्रासह सर्व जिल्हयांमधील ७५ टक्के बांधकाम पूर्ण झालेल्या संस्थांसाठी एकत्रितपणे पदनिर्मिती करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रिसोड (जि.वाशिम) तालुक्यातील काच, उतावळी व विद्रुपा या नद्यावर नदी पुर्नजीवनाचा कार्यक्रम राबविण्याबाबत

**(१४) ८२११० (१५-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलयुक्त शिवार योजने अतंर्गत राज्यात नदी पुर्नजीवनाचा कार्यक्रम शासनाकडून राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, रिसोड तालुक्यातील काच, उतावळी व विद्रुपा (जि.वाशिम) या नदयावर पावसाळयातील पूरस्थिती व सिचंनाच्या सोयी सक्षम करणे यासाठी नदी पुर्नजीवनाचा कार्यक्रम राबविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींने दिनांक ३१ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०७-०२-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) शासनाचे दि.१८ ऑगस्ट, २०१७ चे पत्रान्वये नदी पुनर्जीवन कार्यक्रमांतर्गत नाला उपचार कामाबरोबरच क्षेत्र उपचाराची कामे प्रस्तावित करून शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनूसार सुधारीत प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी, वाशिम यांना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांची १६ पैकी १५ पदे रिक्त असल्याबाबत**

**(१५) ८५९२४ (१९-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयात बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांची १६ पैकी १५ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिक्त पदे असणाऱ्या ठिकाणी अंगणवाडी पर्यवेक्षक यांना प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हयात पूर्णवेळ बालविकास प्रकल्प अधिकारी नसल्याने अनेक कामांवर त्याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन कोल्हापूर जिल्हयातील बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी तातडीने आवश्यक ती कार्यवाही करणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०१-२०१८) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.
कोल्हापूर जिल्हयात बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) १६ पदापैकी १२ पदे रिक्त आहेत. रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार शासन निर्णय दि. २८.७.२०१६ मधील सुचनेनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेमार्फत देण्यात आलेला आहे.
(३) हे खरे नाही.

(४) सरळसेवेच्या कोटयातील ४५ रिक्त पदे भरणेबाबतचे मागणीपत्र शासनास सादर करण्यात आले असून सदरची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत कार्यवाही सुरु आहे. तसेच पदोन्नती कोटयातील रिक्त पदे भरणेबाबतची बिंदुनामावली प्रमाणित करुन मिळण्यासाठी मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालयाकडे आयुक्त, महिला व बाल विकास विभाग यांचे स्तरावरुन मिळविण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गारगुंडी (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील सामाजिक वनीकरण (गायरान) जागेतील झाडांची विनापरवाना व बेकायदा तोड केल्याबाबत**

**(१६) ८५९४३ (१६-०८-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गारगुंडी (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील सामाजिक वनीकरण (गायरान) जागेतील झाडांची विनापरवाना व बेकायदा तोड केल्याचे दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेकायदेशीर झाडे तोडणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) असल्यास, त्यांच्याविरुध्द कोणता गुन्हा दाखल केला आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-१२-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आब्रडं (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथे लघू पाटबंधारे प्रकल्पाच्या कामाबाबत**

**(१७) ८६०७० (१९-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आब्रडं (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथे लघू पाटबंधारे प्रकल्पाला सन १९९८-९९ मध्ये शासनाने मान्यता दिल्यानंतर प्रकल्पग्रस्तांना मोबदला देण्यात आला नाही तसेच सन २००५ पर्यंत उक्त प्रकल्पाचे काम बंद राहिल्याने व प्रकल्पग्रस्तांना मोबदला दिल्यानंतर प्रकल्पासाठी लागणा-या भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाल्याने सन २०१३ पर्यंत धरणाचे ५० टक्के काम पूर्ण होऊन उर्वरित काम निधी अभावी बंद असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधीने निधी उपलब्धतेसाठी केलेल्या प्रयत्नामुळे शासनाने १५.७६ कोटीचा निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर प्रकल्पाचे काम सन २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करण्यात आल्यामुळे सदर प्रकल्पाची घळभरणी आणि त्यानुषंगाने आवश्यक असलेल्या कालव्यांच्या सुरु असलेल्या कामांची सद्यःस्थिती काय आहे,
(३) असल्यास, धरणाचे उर्वरित काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३०-०१-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

आब्रडं लघु पाटबंधारे या योजनेच्या मुख्य धरणाचे काम सन १९९९ पासून सुरू करण्यात आले होते. तथापि धरणग्रस्तांच्या विरोधामुळे नोव्हेंबर, २००५ पर्यंत सदर योजनेच्या मुख्य धरणाचे काम बंद होते. सदर योजनेच्या धरण बैठक, बुडीत क्षेत्र, सांडवा व पुच्छ कालवा इ. करिता आवश्यक खाजगी नुकसान भरपाईचा मोबदला मे, २००५ मध्ये संबंधित खातेधारकांना अदा करण्यात आला आणि डिसेंबर, २००५ पासून मुख्य धरणाचे काम सुरू करण्यात आले. सदरचे काम सन २०११-१२ पर्यंत प्रगतीपथावर होते, परंतु त्यानंतर सुधारित प्रशासकिय मान्यतेअभावी धरणाचे काम पुन्हा बंद करण्यात आले. दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी प्रदान करण्यात आलेल्या रू. १५७६.९१ लक्ष रकमेच्या व्दितीय सुधारित प्रशासकिय मान्यतेनंतर सन २०१५-१६ पासून कामास पुन्हा सुरूवात करण्यात आली.

(२), (३) व (४) आजतागायत धरणाचे सुमारे ५०% काम पूर्ण झालेले असून, योजनेच्या घळभरणी प्रस्तावास अधिक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, ठाणे यांनी दिनांक १३ जानेवारी, २०१७ रोजी मान्यता दिली आहे. तसेच उघडया कालव्याऐवजी पाईप लाईन कालवा प्रस्तावित असून त्यानुसार उपरोक्त कामे हाती घेण्याचे अधिक्षक अभियंता, ठाणे मंडळ कार्यालयाचे नियोजन आहे.

---

**राज्यातील १६ जिल्हयांमध्ये अद्यापही बालविवाह होत असल्याबाबत**

**(१८) ८६१९९ (२२-०८-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात, विशेषतः मराठवाडयात, हुंडाबळी आणि बालविवाहाचे प्रमाण ३० टक्के असल्याची माहिती दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील १६ जिल्हयांमध्ये बालविवाहाचे प्रमाण वाढण्याची माहिती राष्ट्रीय सर्वेक्षण अहवालात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि राज्यात सुरु असलेले बालविवाह रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

परंतु मराठवाडयात हुंडाबळी व बालविवाहाच्या पुढील प्रमाणे घटना घडल्या आहेत.

| वर्ष | हुंडाबळी | बालविवाह |
|---|---|---|
| २०१६ | १०५ | ०३ |
| २०१७ | ६१ | ०३ |

(२) राज्यातील १६ जिल्हयांमध्ये बालविवाहाचे प्रमाण वाढण्याची माहिती राष्ट्रीय सर्वेक्षण अहवालात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे.

परंतु राज्यामध्ये बालविवाहाच्या पुढील प्रमाणे घडलेल्या घटना पहाता बालविवाहाचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते.

| वर्ष | बालविवाह |
|---|---|
| २०१५ | २४ |
| २०१६ | १६ |

(३) होय.
(४) सन २०१५ मध्ये बालविवाहाच्या एकूण २४ घटना व सन २०१६ मध्ये एकूण १६ घटना नोंद झाल्या आहेत. यापैकी १ गुन्हा चुकीच्या वास्तवावर आधारीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर सर्व प्रकरणांमध्ये गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

बालविवाह रोखण्यासाठी अस्तीत्वात असलेल्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी शासन अधिसूचना दि.०३ जून, २०१३ अन्वये ग्रामसेवक यांना त्यांच्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्त केले आहे व संबंधीत ग्राम पंचायत क्षेत्रात नियुक्त केलेल्या अंगणवाडी सेविका, या बाल विवाह प्रतिबंधक अधिका-यास सहाय्य करतील तसेच शासन अधिसूचना दि.१८ ऑगस्ट, २०१६ अन्वये बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना आपापल्या संबंधित प्रकल्प क्षेत्रावर अधिकारीता असणारे बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणुन नियुक्ती केली आहे, आणि बाल विवाह प्रतिबंध अधिका-याला सहाय्य करण्याकरिता संबंधित बालविकास प्रकल्प (नागरी) या अंतर्गत नेमलेल्या अंगणवाडी पर्यवेक्षिकांची देखील नियुक्ती केली आहे. तसेच प्रत्येक जिल्हयात केंद्र शासनाच्या एकात्मिक बाल संरक्षण योजने अंतर्गत जिल्हास्तरावर जिल्हा बाल संरक्षण कक्ष स्थापन करण्यात आलेला असून, या कक्षा मार्फत बाल विवाह रोखण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील १० कोल्हापूरी बंधारे धोकादायक झाल्याबाबत**

**(१९) ८७०३९ (११-०८-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजरा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील १० कोल्हापूरी बंधारे अवजड वाहतुकीमुळे धोकादायक झाल्याचे माहे मे २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्याची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीत काय आढळून आले व तद्नूसार सदर बंधाऱ्याची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०१-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) कोल्हापूर जिल्हयामधील १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या ०९ कोल्हापूरी बंधा-यांपैकी ०४ योजना कोल्हापूर पाटबंधारे विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित ०५ योजनांपैकी ०२ योजना प्रगतीत असून आजरा तालुक्यातील सोहाळे, शेळप व किटवडे हया ०३ को.प. बंधाऱ्यांची सिंचनासंबंधात आवश्यक दुरूस्ती जसे कि, को.प. बंधाऱ्याच्या दरवाजातून होणारी पाणी गळती थांबविण्यासाठी लोखंडी दरवाजे नव्याने बसविणे व आवश्यकतेप्रमाणे बांधकाम या बाबी लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, कोल्हापूर या कार्यालयामार्फत प्रगतीत आहे.

उपरोक्त नमूद को.प. बंधाऱ्यांची कामे पूर्ण झाल्यापासून बंधाऱ्यावरील वाहतुकीच्या घनतेत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असून सदर बंधारे अवजड वाहतुकीसाठी धोकादायक बनत आहेत. सदर बंधाऱ्यावरील वाहतुकीचा ताण कमी होण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पर्यायी पुलाचे बांधकाम होणे आवश्यक आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागातील २६ पैंकी २३ बालविकास प्रकल्प अधिकारी आणि उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(२०) ८७५७९ (२१-०८-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागातील २६ पैंकी २३ बालविकास प्रकल्प अधिकारी आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पद रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर पदे रिक्त असल्याने ११ कोटीच्या अंगणवाडयाची कामे रखडली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार बालविकास प्रकल्प अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांची पदे भरुन जिल्हयातील अंगणवाडयाची रखडलेली कामे पूर्ण व्हावीत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०१-२०१८) :** (१) नाशिक जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागातील बाल विकास प्रकल्प अधिकारी २६ पदे रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार हा इतर अधिकारी/कर्मचारी यांचेकडेस सोपविण्यात आलेला होता. शासन स्तरावरुन दि. १२ जून २०१७ चे शासन निर्णय निर्णयान्वये १५ बाल विकास प्रकल्प अधिकारी ग्रामीण यांची पदे भरण्यात आलेली आहेत.

तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) यांचे पद देखिल बदलीने भरणेत आलेले आहे.

(२) हे खरे नाही.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील मुख्य ग्रामीण आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबत

**(२१) ८७९०१ (१२-०८-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील मुख्य ग्रामीण आरोग्य केंद्रामध्ये पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे रुग्ण व नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये औषध निर्माण अधिकारी ३ पदे असताना एकच पद भरले आहे तसेच १२ परिचारिकांची पदे मंजूर असताना ७ परिचारिका कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत तातडीने कर्मचाऱ्याची पदे भरण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही. ग्रामीण रुग्णालय, मुरबाड, जि.ठाणे येथे वैद्यकीय अधिकाऱ्यांची एकूण ४ मंजूर पदांपैकी २ पदे भरलेली असून २ पदे रिक्त आहेत. गट क च्या एकूण १४ मंजूर पदांपैकी १३ पदे भरलेली असून १ पद रिक्त आहे व गट ड च्या एकूण ७ मंजूर पदांपैकी ३ पदे भरलेली असून ४ पदे रिक्त आहेत. ग्रामीण रुग्णालय, मुरबाड,

जि.ठाणे एकूण २५ मंजूर पदांपैकी १८ भरलेली असून ७ पदे रिक्त आहेत. तथापि, ग्रामीण रुग्णालय, मुरबाड जि.ठाणे येथे रुग्णांवर योग्य ते उपचार करण्यात येत असून रुग्णांची गैरसोय होत नाही.
(२) हे खरे नाही. ग्रामीण रुग्णालय, मुरबाड, जि.ठाणे येथे औषध निर्माण अधिकारी या संवर्गाचे १ पद मंजूर असून ते भरलेले आहे. तसेच अधिपरिचारीकांची ७ पदे मंजूर आहेत व ७ ही पदे भरलेली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करगणी (जि. सांगली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील पदे रिक्त असल्याबाबत**

**(२२) ८८७०३ (२१-०८-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करगणी (जि.सांगली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील मंजूर २५ पदांपैकी १५ पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०१७ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०१-०१-२०१८) :** (१) करगणी, ता.आटपाडी, जि.सांगली या प्राथमिक आरोग्य केंद्राकडे एकूण ३० अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे मंजूर असून त्यापैकी १८ पदे भरलेली आहेत. व १२ पदे आज अखेर रिक्त आहेत.
(२) ही पदे बदल्यांमुळे रिक्त झाली आहेत.
(३) वैद्यकीय अधिकारी, गट-अ या संवर्गातील पदे शासन स्तरावरुन भरली जात असून वेळोवेळी सदर प्राथमिक आरोग्य केंद्राकडे नियुक्ती देण्यात आली आहे. त्यामुळे सदरची पदे दिर्घ कालावधीसाठी रिक्त राहिलेली नाहीत.
तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांच्या बदल्या व सेवानिवृत्ती या कारणास्तव सदरची पदे रिक्त झाली असून वेळोवेळी पदभरती व बदल्या या माध्यमातून सदरची रिक्त पदे भरण्यात येतात.
(४) सदर रिक्त असणारी पदे सरळ सेवा भरती, आंतरजिल्हा बदली व पदोन्नती याद्वारे भरण्यात येतील.

---

**चांदुर रेल्वे, (ता.धामणगांव, जि.अमरावती) येथील मंगरुळ च. नदीचे खोलीकरण करणाऱ्यांचे काम जलयुक्त शिवारामध्ये घेण्याबाबत**

**(२३) ८८९२३ (१८-०८-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदुर रेल्वे, (ता.धामणगांव, जि.अमरावती) येथील मंगरुळ च. नदीचे खोलीकरण करणाऱ्यांचे काम जलयुक्त शिवारामध्ये घेण्याबाबतचे निवेदन संबंधित उपविभागीय अधिकारी, चांदुर रेल्वे यांना पाठविण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०६-०२-२०१८) :** (१) सदर निवेदन दि.१८/११/२०१६ रोजी उपविभागीय अधिकारी, चांदुर रेल्वे यांना देण्यात आले आहे.

(२) चांदुर रेल्वे (ता.धामणगाव, जि.अमरावती) येथील मंगरूळ च. येथील साखळी नदीवर खोलीकरणासह ०५ सिमेंट नाला बांधाच्या कामांना प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्यापैकी ०३ कामे सूरू असून ०२ कामे ई - निविदा प्रक्रियेत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर सोमवार पेठ येथील राज्य कामगार विमा रूग्णालयात बाहयरूग्ण विभागात रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(२४) ८९९१२ (१९-०८-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर सोमवार पेठ येथील राज्य कामगार विमा रूग्णालय बाहयरूग्ण विभागातील ओपीडी वेळेत न उघडता १०.०० वाजता उघडल्या जात असल्याने रूग्णाची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे दिनांक ९ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१८-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) संचालक (प्रशासन) यांनी वैद्यकीय अधिक्षक, राकावियो रुग्णालय, नागपूर यांना सर्व डॉक्टर्सना वेळेवर उपस्थित राहण्याबाबत सक्त ताकीद देण्यास सुचित केले असून त्यानुषंगाने दि.०९.०५.२०१७ अन्वये सर्व डॉक्टरांना वेळेवर उपस्थित राहण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय (मेडीकल) येथील आठ व्हेंटीलेटर, चार एक्स-रे मशीन, शस्त्रक्रिया गृहातील वातानुकूलीन यंत्र बंद असल्याबाबत**

**(२५) ८९९१४ (११-०८-२०१७). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय (मेडीकल) येथील आठ व्हेंटीलेटर, चार एक्सरे मशीन, शस्त्रक्रिया गृहातील वातानुकूलीन यंत्र असे एकूण ३२ यंत्र बंद असल्याचे दिनांक ३ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर यंत्र बंद असल्यामुळे गरीब रूग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२४-०१-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दिनांक ३.५.२०१७ रोजी बाळरोग विभागातील १ व्हेंटीलेटर, ०४ वातानुकूलीत यंत्रे नादुरुस्त होते, तथापि एक्सरे मशीन सुरुळीतपणे कार्यान्वित होते.

(२) हे खरे नाही

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**राज्यातील जलयुक्त शिवार योजनेची आणि शेततळ्यांची कामे दोन महिन्यात पूर्ण करण्याचे निर्देश**

**(२६) ९०६४६ (१९-०८-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जलयुक्त शिवार योजनेची आणि शेततळयांची कामे दोन महिन्यात पूर्ण करण्याचे निर्देश राज्याचे मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास राज्यातील जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच अकोला जिल्हातील शेततळयांची कामे दिनांक ३० जून, २०१७ रोजीपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश मा.जलसंधारण मंत्री यांनी दिनांक २२ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांसाठी शासनाने किती निधी उपलब्ध करुन दिला आहे, तसेच सदरची किती कामे माहे जून, २०१७ अखेरपर्यंत पूर्ण करण्यात आली आहेत व किती कामे प्रलंबित आहेत,

(४) तसेच कामे पूर्ण न करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०६-०२-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) राज्यात “मागेल त्याला शेततळे” योजनेंतर्गत माहे जून, २०१७ अखेर ८०.०० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. दिनांक २४/११/२०१७ रोजी ५६०९५ शेततळी पूर्ण झाली आहेत.

अकोला जिल्हयात “मागेल त्याला शेततळे” योजनेंतर्गत दि.२४/११/२०१७ पर्यंत ६४८ कामे पूर्ण झाली आहेत. सदर कामांकरीता रू.३३२.२२ लाख निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागांतर्गत त्र्यंबकेश्वर तालुक्यातील कोल्हापूर बंधाऱ्यांची व सिमेंट कॉंक्रीट बंधाऱ्यांची कामे निकृष्ट दर्जाची करण्यात आल्याबाबत**

**(२७) ९११०९ (१८-०८-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाअंतर्गत त्र्यंबकेश्वर तालुक्यातील बोरीपाडा, ओझरखेड, कडेगव्हाण, शिरसगाव या ठिकाणी कोल्हापूर बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्याची कामे व तसेच खडकओहोळ व कडेगव्हान या ठिकाणच्या सिमेंट कॉक्रीट बंधाऱ्यांची कामे निकृष्ठ दर्जाची करण्यात आल्यामुळे शासनाच्या निधीचा अपव्यय झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आलेले आहे,
(३) असल्यास, चौकशी अहवालानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (३०-०१-२०१८) :** (१) नाही, हे खरे नाही.

प्रश्नांकित कामांपैकी को.प. बंधारा दुरूस्ती बोरीवाडा, ओझरखेड, कडेगव्हान, शिरसगाव व सिमेंट कॉंक्रीट बंधारा कडेगव्हाण ही कामे अंदाजपत्रकाप्रमाणे पूर्ण करण्यात आलेली असून सिमेंट कॉंक्रीट बंधारा खडकओहोळ हे काम प्रगतीत आहे.
(२), (३) व (४) होय, याबाबत कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग (पश्चिम), जिल्हा परिषद, नाशिक या कार्यालयामार्फत पाहणी करण्यात आलेली आहे. सदर पाहणीदरम्यान

सदरची कामे गुणवत्तेनुसार पूर्ण झालेली असून, त्याबाबत दक्षता व गुणनियंत्रण विभागाचा गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त असल्याचे तसेच आजमितीस दुरूस्ती केलेल्या कामांमध्ये पाणीसाठा होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

---

**लोहारा (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथील शेतकऱ्याचे शेतात कृषी विभागामार्फत नाला सरळीकरणाचे काम केल्याबाबत**

**(२८) ९१३५६ (११-०८-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहारा (ता.राळेगाव, जि.यवतमाळ) येथील शेतकरी श्री मुकूंदा वाऱ्हेकर यांच्या शेत.सर्वे नं २२६ क्षेत्रफळ १ हे ४१ आर शेतामध्ये कृषी विभागामार्फत नाला सरळीकरणाचे काम केल्याचे दिनांक ११ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू काम करत असतांना कंत्राटदारांने शेतकऱ्याला कोणतही सुचना दिली नाही तसेच नाला सरळीकरणामध्ये अल्पभुधारक शेतकऱ्याच्या शेताचे नुकसान केल्याच्या तक्रारीमध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी विभागाचे अधिकारी आणि काम करणारे कंत्राटदार निष्काळजी मुळे अल्पभुधारक शेतकऱ्याला नुकसानभरपाई देण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०६-०२-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत मौजा लोहारा येथे नाला सरळीकरणाचे काम करण्यात आले नसून नाला खोलीकरणाचे काम करण्यात आले.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे करवंड (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील तलाव क्रमांक २ व ३ या पाझर तलावांचे काम सुरू करणे बाबत**

**(२९) ९१३९१ (१९-०८-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे करवंड (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील तलाव क्रमांक २ व ३ या पाझर तलावांच्या शासनाकडे असलेल्या प्रस्तावास मापदंड वाढवून प्रशासकीय मान्यता देवून निधी उपलब्ध करून देणेबाबत मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. जलसंधारण मंत्री, यांच्याकडे दिनांक १८ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावाला मान्यता व निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०६-०२-२०१८) :** (१) असे पत्र आढळून आले नाही.

(२) मौजे करवंड (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील तलाव क्र.१ व २ या योजनांचा विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमात डी.पी.आर.३ मध्ये समावेश आहे. शासन पत्र दि.२०/०२/२०१४ अन्वये डी.पी.आर.३ मंजूरी प्राप्त आहे. सदर सोजना दरसुची सन २०११-१२ नुसार तयार करण्यात आलेले असून त्यावेळचे मापदंडामध्ये सफल आढळत होती.

सदर योजनेचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेकरिता दि.१५/०७/२०१४ च्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आली होती. शासनाकडून दि.३/११/२०१४ अन्वये त्रुटीपूर्ततेकरिता परत पाठविण्यात आले होते. सदर अंदाजपत्रक त्रुटीपूर्तता करुन अद्यावत केले असता असफल आढळतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकरदन (जि.जालना) तालुक्यातील जळगाव सपकाळ परिसरात असलेल्या चार कोल्हापुरी बंधाऱ्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३०) ९१५६४ (१९-०८-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन तालुक्यातील (जि.जालना) जळगाव सपकाळ परिसरात असलेल्या चार कोल्हापुरी बंधा-यांची दुरवस्था झालेली असून पावसाळा सुरू होण्याआधी बंधारा दुरुस्त करण्याची मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कोल्हापुरी बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१८-०१-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

चार बंधा-यांपैकी एक बंधारा सुस्थितीत असून बंधारा क्र. १, ३ व ४ हे बंधारे सन २०१५ मधील अतिवृष्टीमुळे नादुरूस्त झालेले आहेत.

(२) व (३) अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या तीनही कोल्हापूरी बंधाऱ्यांची स्थळ पाहणी कार्यकारी अभियंता, (लघुपाटबंधारे), जिल्हा परिषद जालना कार्यालयामार्फत करून, दुरूस्तीच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच दुरूस्तीसाठी आवश्यक असणाऱ्या निधीची मागणी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद जालना यांचेकडून दिनांक २८/०९/२०१५ व दिनांक ०८/१०/२०१५ च्या पत्रान्वये अनुक्रमे जिल्हाधिकारी, जालना व विभागीय आयुक्त, औरंगाबाद कार्यालयाकडे सादर करण्यात आली आहे.

---

**मुर्तिजापूर (जि.अकोला) येथील जलयुक्त शिवार योजनेची**
**कामे संथ गतीने सुरु असल्याबाबत**

**(३१) ९१८६४ (१९-०८-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुर्तिजापूर (जि.अकोला) येथील जलयुक्त शिवार योजनेची कामे संथ गतीने सुरु असल्योच माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच काही कामांना अद्यापही सुरुवात झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०६-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

जलयुक्त शिवार अभियान सन २०१६-१७ अंतर्गत मुर्तिजापूर तालुक्यात विविध यंत्रणेमार्फत ४६३ कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. एकूण कामापैकी ३३९ कामांना तांत्रिक मंजूरी, ३२६ कामांना प्रशासकिय मंजूरी देण्यात आली असून १९५ कामे हाती घेण्यात आली आहेत त्यापैकी १७० कामे पूर्ण झाली आहेत.

शासन स्तरावरून सन २०१६-१७ मधील निवड केलेल्या गावातील प्रस्तावित कामे पूर्ण करण्यासाठी मार्च, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यानूसार कामे मार्च, २०१८ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चोपडा (जि.जळगाव) तालुक्यातील जलयुक्त शिवार योजनेतील बंधारे**
**बांधण्यासाठी पाया खोलीकरणाच्या अटीत बदल करण्याबाबत**

**(३२) ९२०६२ (१८-०८-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि. जळगाव) तालुक्यातील जलयुक्त शिवार योजनेतील बंधारे बांधण्यासाठी पाया खोलीकरणाच्या अटीत बदल करण्यात यावेत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ मार्च, २०१७ रोजी मा.जलसंपदा व जलसंधारण राज्यमंत्री यांचेकडे पत्राव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०७-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) यासंदर्भात शासन निर्णय दि.२३ जून, २०१७ नूसार सिमेंट कॉक्रीट नाला बांधाच्या भौतिक व आर्थिक मापदंडाबाबत एकत्रित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पिंपरखेड (ता.भडगांव, जि.जळगांव) येथील शेतकऱ्यांच्या शेताजवळ कृषि विभागामार्फत बांधण्यात आलेल्या चार बंधाऱ्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(३३) ९२१८६ (१८-०८-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पिंपरखेड (ता.भडगांव, जि.जळगांव) येथील शेतकऱ्यांच्या शेताजवळ कृषि विभागामार्फत बांधण्यात आलेल्या चार बंधाऱ्यांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याप्रकरणी मा.जलसंधारण मंत्री, जिल्हा कृषि अधिकारी, जळगांव यांच्यासह संबधित अधिकाऱ्यांकडे दिनांक २२ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास शेतकऱ्यांनी लेखी निवेदन तक्रार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार दोषी व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०९-०१-२०१८) :** (१) मौजे पिंपरखेड येथील शेतकऱ्यांनी तालुका कृषि अधिकारी, भडगाव यांचेकडे लेखी निवेदन दिले आहे.
(२) तक्रारीच्या अनुषंगाने तालुका कृषि अधिकारी, भडगाव यांचेमार्फत संबंधित कामांची तपासणी करण्यात आली असून तपासणी अहवालानूसार मौजे पिंपरखेड येथील सिमेंट नाला बांधाचे बांधकाम मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे पूर्ण करण्यात आले आहे. प्रस्तुत सिमेंट नाला बांधांची कामे चांगल्या प्रतीचे झाले असून बांधांना कोठेही गळती आढळून आलेली नाही.

तथापि, नाला खोलीकरणाच्या कामात मंजूर अंदाजपत्रक व प्रत्यक्ष कामात तफावत आढळून आली आहे.
(३) नाला खोलीकरण कामांची खोली व लांबी अंदाजपत्रकापेक्षा कमी आढळल्यामुळे संबंधित कंत्राटदाराची देयके अद्याप अदा करण्यात आलेली नाहीत. खरीप हंगाम संपल्यानंतर काम पूर्ण करून देण्याबाबत संबंधित कंत्राटदारास सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महिला व बालविकास विभागातील विविध पदोन्नतीचे पदे व रिक्त पदांबाबत**

**(३४) ९२५२८ (१६-०८-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिला व बाल विकास विभागातील विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पदोन्नतीची पदे व रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया तात्काळ सुरु करण्याचे निर्देश मा.महिला व बाल विकास मंत्री यांनी दिले असल्याचे माहे मे, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०१-२०१८) :** (१) व (२) गट-ब संवर्गातील सरळसेवेतील (नामनिर्देशन) रिक्त पदांपैकी १४५ पदे शासन निर्णय दि. १२.६.२०१७ अन्वये भरण्यात आलेली आहे. उर्वरीत रिक्त पदांचे मागणीपत्र शासनास सादर करण्यात आले असून सदरची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

गट-ब संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबत आरक्षण निश्चितीबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडे सादर करण्यात आला असून सदरचे आरक्षण निश्चित होऊन प्राप्त होताच पदोन्नतीची रिक्त पदे भरणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबतची कार्यवाही आयुक्त, महिला व बाल विकास विभाग यांचे स्तरावरुन सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**देगलूर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील नदी पुनर्जीवन विकास योजनेंतर्गत कामांचे प्रस्ताव**

**(३५) ९२७०९ (१९-०८-२०१७). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील नदी पुनर्जीवन विकास योजनेंतर्गत कामांचे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करण्याचे निर्देश शासनाने दिनांक २३ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी, नांदेड व लघुसिंचन (जलसंधारण) विभाग नांदेड यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहेत काय,

(३) असल्यास, उक्त कामांना मंजुरी देण्यात आली आहे काय,

(४) अद्यापी सदरील प्रस्ताव शासनास प्राप्त झाले नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०७-०२-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) शासनाचे दि.१८ ऑगस्ट, २०१७ चे पत्रान्वये नदी पुनर्जीवन कार्यक्रमांतर्गत नाला उपचार कामाबरोबरच क्षेत्र उपचाराची कामे प्रस्तावित करून शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या

मार्गदर्शक सूचनांनूसार सुधारीत प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी, नांदेड यांना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दोडी (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील सिमेंट बंधा-याचे काम निकृष्ट पध्दतीचे सुरु असल्याबाबत**

**(३६) ९३००९ (१९-०८-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दोडी (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील सिमेंट बंधाऱ्याचे काम निकृष्ट पध्दतीचे सुरु असल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०६-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिमूर (जि.चंद्रपूर) तालुक्यातील २७ गावात जलयुक्त शिवार योजनेंतर्गतच्या कामांबाबत**

**(३७) ९३३७७ (१९-०८-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिमूर (जि.चंद्रपूर) तालुक्यातील २७ गावात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत सुरु असलेली कामे अंदाजपत्रकाप्रमाणे होत नसून कृषि विभागाचे अधिकारी व ठेकेदारांच्या संगनमताने जुजबी कामे करुन अधिक रक्कमेची देयके काढल्याचे दिनांक ५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०६-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील तिवसा, भातुकली, अमरावती व मोर्शी या तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियांनाअंतर्गत संबंधित विभागाकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्यात येऊन निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(३८) ९३४३१ (१९-०८-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील तिवसा, भातुकली, अमरावती व मोर्शी या तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियांनाअंतर्गत संबंधित विभागाकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्यात येऊन निधी उपलब्ध करण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांना जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिनांक ६ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर निवेदनावर कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०७-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) निवेदनामध्ये नमूद एकूण प्रस्तावित २५ कामापैकी ०६ कामांना जलयुक्त शिवार अभियानांतर्गत प्रशासकिय मान्यता प्रदान करून ०५ कामे पूर्ण झाली असून ०१ काम प्रगतीपथावर आहे. उर्वरित १९ कामापैकी ०३ कामाची गावे जलयुक्त शिवार अभियानात समाविष्ट आहेत परंतु सदर कामे जलयुक्त शिवार योजनेमध्ये अनुज्ञेय नाहीत व उर्वरित १६ कामांची गावे जलयुक्त शिवार अभियानांतर्गत समाविष्ट नाहीत.

उर्वरित १९ कामे तांत्रिक सर्वेक्षणानूसार सफल ठरल्यास कामांची निकड, प्राथम्य, विविध स्त्रोतामधून वर्ष निहाय उपलब्ध होणारा निधी स्त्रोत व लोकसहभाग इ. बाबी विचारात घेऊन सदर कामांचे नियोजन करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील धामणी येथे जलयुक्त शिवार अंतर्गत असलेले बंधाऱ्याचे काम खाजगी जागेत बांधण्यात आल्याबाबत**

**(३९) ९३८६८ (२१-०८-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील धामणी येथे जलयुक्त शिवार अंतर्गत १३ लाख रुपये खर्च करुन बांधण्यात येत असलेल्या बंधाऱ्यांचे काम शासकिय जागेत न बांधता धामणी येथे सुरु असलेल्या ईशान्य बंगलो प्रोजेक्ट या विकासकाच्या खाजगी जागेत बांधण्यात आल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बंधारा विकासकाच्या खाजगी जागेत बांधण्यात आल्यामुळे शिवाराचे पाणी शेतकरी वा विकासकासाठी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीविरुध्द शासन स्तरावर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०६-०२-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) प्रस्तुत बंधाऱ्याबाबत मंडळ अधिकारी, कशेळे यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून त्यांचे अहवालानूसार बंधारा बांधण्यात आलेला नाला खाजगी जागेतून जात असला तरीही नाल्याचे क्षेत्र हे सरकारी असून गावचे तेरजेमध्ये एकूण गोळा क्षेत्र १८.१७.३० हे.आर म्हणून दाखवले आहे. गावचे नकाशामध्ये प्रस्तुत नाल्याबाबत तसा स्पष्ट उल्लेख आहे.

दि.१७/३/२०१७ रोजी ग्रुप ग्रामपंचायत, धामणी यांनी सदर सिमेंट काँक्रीट बंधारा सर्वे नं.८९ मध्ये बांधण्यात यावा असा ठराव सर्वानुमते मंजूर केला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या वनखात्याच्या अखत्यारितील सर्वच जंगल परिसरांची तपासणी करण्याबाबत**

**(४०) ९५९०२ (२६-१२-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या वनखात्याच्या अखत्यारितील जंगलामध्ये अनेक ठिकाणी हातभट्टीचा व्यवसाय केला जात असल्याच्या तक्रारींवर उपाययोजना करण्यासंदर्भात मा.वनेमंत्री यांच्या उपस्थितीत दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहासमोर बैठक घेतलेली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी बैठकीत घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०१-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, शासनपत्र दिनांक २७.१०.२०१६ अन्वये वनक्षेत्रात अवैध दारुभट्टी आढळल्यास गुन्हे दाखल करण्याचे निर्देश प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,

नागपूर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर, व्यवस्थापकीय संचालक एफडीसीएम लि. नागपूर तसेच अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियानाची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(४१) ९६४१९ (२६-१२-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय यांनी तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मोताळा अंतर्गत पदस्थापना असलेले कृषि सहाय्यक कर्मचारी इतर तालुक्यात प्रतिनियुक्तीवर पाठविल्याने कृषि विभागाची शेततळे, पाणलोटची, जलयुक्त शिवार अभियानाची कामे प्रलंबित राहिल्याचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचारी कृषी सहायक यांच्या अभावामुळे इतर कर्मचाऱ्यावर कामाचा ताण पडत असुन कामकाज व विकास कामे प्रलंबीत राहिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तालुका कृषी अधिकारी मोताळा (जि.बुलडाणा) येथे पदस्थापना असलेले कृषी सहायक कर्मचारी व इतर कर्मचारी यांची सेवा मोताळा तालुक्यात नियमीत करणे बाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०६-०२-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बसमत (जि.हिंगोली) तालुक्यात बेकायदेशीर वृक्षतोड होत असल्याबाबत**

**(४२) ९६९५३ (२६-१२-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बसमत (जि.हिंगोली) तालुक्यात लाकूड तस्करी करणाऱ्या टोळया बेकायदेशीर वृक्षतोड करीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी वन विभागातील अधिकाऱ्यांचे आर्थिक संगनमत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वृक्षतोड, लाकूड तस्करी करणारे व वन विभागातील संबंधीत दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यता येत आहे,
(५) नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०१-२०१८) :** (१) माहे सप्टेंबर २०१७ मध्ये वा त्या सुमारास वसमत (जि.हिंगोली) वनपरिक्षेत्र अंतर्गत लाकूड तस्करी करणाऱ्या टोळया बेकायदेशीर वृक्षतोड करीत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे भाताणे (ता.वसई, जि.पालघर) परिक्षेत्रात वन अधिकाऱ्यांवर हल्ला केल्याबाबत**

**(४३) ९७९१२ (२६-१२-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे भाताणे (ता.वसई, जि.पालघर) परिक्षेत्रात होणारी लाखो रुपयांची खैर व अन्य वनस्पतींची वारंवार तस्करी रोखण्याकरीता गेलेल्या भाताणे परिक्षेत्र वनअधिकारी व त्यांच्या सहकाऱ्यांवर खैर तस्करांनी दगडाचा प्रचंड हल्ला करुन त्यांना तेथून पळवून लावल्याचे दिनांक १९ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अधिकाऱ्यांच्या मदतीला गावकरी धावून आल्याने गावकऱ्यांच्या मदतीने अधिकाऱ्यांनी झाडांची तस्करी करणारे तस्कर व त्यांचे सहकारी यांचेपैकी दोघांना पकडून तस्करांची गाडी जप्त केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तस्करांनी एकूण किती झाडांची तस्करी करण्याची योजना आखल्याचे जप्त केलेल्या मालावरुन निष्पन्न झाले, अटक केलेल्या व्यक्ती व जप्त केलेल्या गाडीवरुन, झाडांची तस्करी करणारे तस्कर कोण आहेत याचा तपास पूर्ण झाला आहे काय
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०१-२०१८) :** (१) डहाणू वनविभागातील भाताणे वनपरिक्षेत्रात दिनांक १५.१०.२०१७ रोजी वनकर्मचाऱ्यांना मिळालेल्या माहितीवरुन ते खैरलेंडी येथे कार्यवाहीसाठी गेले असता सेंट्रो कार संशयावरुन अडवून तपासले असता, त्यामध्ये खैर वृक्ष तोडीचा माल वाहतूक होत असल्याचे आढळले. ही बाब खैर तस्करांचे निदर्शनास आलेने त्यांनी जप्त वाहन पळवून नेण्याचे उद्देशाने जप्त वाहनाच्या दिशेने दगडफेक करुन कर्मचाऱ्यांवर हल्ला केला.
(२) हे खरे आहे.

गावकऱ्याच्या मदतीने दोघांना पकडण्यात आले व वाहन जप्त करण्यात आले.
(३) व (४) प्रकरणी चौकशी केली असता अवैध खैर २ झाडे, नियतक्षेत्र कळंभोण संपादीत वन (राखीव) स.नं.८७ व ८८ मधील तोडून त्यापासून सोलीव खैर नग ३९ घ.मि. ०.४८९ किंमत रु.३६५९/- चा वनोपज जप्त करणेत आलेला आहे. तसेच १) श्री.खालीद चांद शेख २) चंद्रकांत परशुराम बंदरे रा.खैरलेंडी ता.वसई, जि.पालघर या दोन आरोपींना अटक करुन त्यांना प्रथम वर्ग दंडाधिकारी, वसई यांचे न्यायालयात हजर करणेत आले होते. मा.न्यायालयाने आरोपींना दिनांक १७.१०.२०१७ रोजी जामीन मंजूर केला आहे. सदर प्रकरणी उर्वरीत आरोपींचा शोध घेणे चालू आहे. वनगुन्हयातील सेंट्रो कार वाहन क्र.एमएच-०४/सीडी-१५७९ व जप्त वनोपज भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ६१ अन्वये प्राधिकृत अधिकारी यांचेमार्फत सरकारजमा करणेची कार्यवाही सुरु आहे.

---

## पारनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील सामाजिक वनीकरण विभागाच्या कार्यालयात रोपवाटिकेत काम करणाऱ्या मजुरांच्या हजेरी पत्रकावर बनावट सहया करुन शेकडो मजुरांची लागवड अधिकाऱ्यांनी फसवणूक केल्याबाबत

**(४४) ९८८२७ (२६-१२-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील सामाजिक वनीकरण विभागाच्या कार्यालयात रोपवाटिकेत काम करणाऱ्या मजुरांच्या हजेरी पत्रकावर बनावट सहया करुन शेकडो मजुरांची लागवड अधिकाऱ्यांनी फसवणूक केल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषद सदस्य यांच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पारनेर तहसिलदार व पोलीस निरीक्षक यांना पंचनामा करण्याबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक ५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बाबत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधी व जिल्हापरिषद सदस्य यांनी पारनेर तहसिलदार व पोलीस निरीक्षक यांचे उपस्थितीत दिनांक २९.०९.२०१७ रोजी ऑनलाईन वेजलिस्ट व हजेरीपत्रकातील मजुरांचे नांवे एकच असल्याचे खात्री केली. त्यामुळे पंचनामा वगैरे करण्याचा प्रश्न उद्भवला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिरूर (जि.पुणे) तालुक्यात पिंपळ सुटी गावात बिबट्याने झडप घालून पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना जखमी केल्याबाबत**

**(४५) ९९०८६ (२६-१२-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरूर (जि.पुणे) तालुक्यात पिंपळ सुटी गावाजवळ अकरा मैल वस्तीवर बिबटयाने झडप घालून पशुवैद्यकीय अधिकारी गंभीर जखमी होण्याची घटना दिनांक १० सप्टेंबर, २०१७ रोजी घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिरूर तालुक्यात अनेक ठिकानी बिबटयाने हल्ला केल्याच्या घटना घडुन देखील वन परिक्षेत्र अधिकारी यांना राज्य स्तरीय अधिकारी, नागपूर यांच्या कडून पिंजरा लावण्याची परवानगी घ्यावी लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने वारंवार होणाऱ्या बिबट्यांचे हल्ले रोखण्यासाठी तातडीने पिंजरा लावण्याची परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०२-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या अनुसुचि-१ मधील वन्यप्राणी मानव जिवितास धोकादायक ठरल्यास वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ११ (१) (अ) अन्वये अनुसुची-१ मधील वन्यप्राण्याला पकडण्यासाठी आदेश जारी करण्याचे अधिकार राज्याचे मुख्य वन्यजीव रक्षक यांना आहेत.

बिबट वन्यप्राणी हे अनुसुचि-१ मधील समाविष्ट असल्याने जेव्हा वन्यप्राणी मानवी जिवीतास धोकादायक ठरल्यास त्याला बंदिस्त करण्यासाठी नियमानुसार मुख्य वनजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडून परवानगी घ्यावी लागते.

मानवी जिवितास धोकादायक ठरलेल्या वन्यप्राण्याची ओळख पटवून व याबाबतचे सबळ पूरावे नमुद करुन दस्ताऐवज सलग्न करुन प्रस्ताव प्राप्त झाल्यावर मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेमार्फत पिंजरा लावण्याची परवानगी देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हदगाव (जि.नांदेड) तालुक्यातील शेतकऱ्यांकडून अतिक्रमीत करुन त्याजमिनीवर वनविभागाने वृक्षलागवड केल्याबाबत**

**(४६) ९९३८३ (२६-१२-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगाव (जि.नांदेड) तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांच्या नावे सातबारा असलेल्या जमिनी वनविभागाने आपल्या असल्याचे सांगून शेतकऱ्यांकडून अतिक्रमीत करुन त्याजमिनीवर वनविभागाने वृक्षलागवडही केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परंतू सदर जमिनी शेतकऱ्यांच्या असल्याच निर्णय मा.जिल्हा न्यायालयाने दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निर्णयानुसार सदर शेतक-याच्या जमिनी परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
शेकडो शेतकऱ्यांच्या नांवे ७/१२ असलेल्या जमिनीवर लागवड केलेली नसून हदगांव तालुक्यातील मौजे मनाठा येथील ५० हेक्टर क्षेत्रावर व मौजे पळसा येथील १५ हेक्टर क्षेत्रवर वन विभागाचे वनजमिनीवर वृक्ष लागवड केलेली आहे.
(२) व (३) मौजे मनाठा येथील ५० हेक्टर क्षेत्राच्या संदर्भात दिवाणी न्यायालय, नांदेड येथे दाखल केलेल्या दिवाणी दाव्यासंदर्भात झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने अपिल करण्याची प्रक्रिया सुरु आहे तसेच मौजे पळसा येथील रोप लागवडीबाबत दाखल केलेल्या दिवाणी दाव्यासंदर्भात पारीत झालेल्या अंतरिम आदेशाविरोधात वन विभागाने जिल्हा सत्र न्यायालयात अपील दाखल केलेले आहे.सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा आणि गगनबावडा तालुक्यात दोन वेगवेगळया टस्कर हत्तींनी ठाण मांडल्याबाबत

**(४७) १००२५५ (२६-१२-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा आणि गगनबावडा या तालुक्यात दोन वेगवेगळया टस्कर हत्तींनी ठाण मांडल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हत्तीच्या वावरामुळे शेतीचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, या हत्तीला हुसकावून लावण्याकरीता व शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०८-०२-२०१८) :**(१) व (२) हे खरे आहे.
(३) कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा आणि गगनबावडा या तालुक्यात हत्ती या वन्यप्राण्यांनी माहे सप्टेंबर, २०१७ व त्या दरम्यान शेतपीकांचे नुकसान केल्याच्या ९९ प्रकरणे निदर्शनास

आली आहेत. प्रस्तूत प्रकरणी प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना रु. ७,२६,१०८/- इतकी नुकसान भरपाईकरीता अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

वन्यप्राण्यांनद्वारे नुकसान होऊ नये व मानव वन्यहत्ती संघर्ष कमी व्हावा यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींकडून सर्वांना प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात येते.

• गावकऱ्यांच्या मदतीने टॉर्च, फटाके, अग्नीबाण इ. चा वापर करुन व हाकारा गट तयार करुन हत्तींना शेती व मानवी वस्तीपासून दूर नेण्यात येते.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी उपाययोजना केल्या जातात.

• काही क्षेत्रात वनहद्दींवर वन्यप्राणी प्रतिबंधक चर खोदण्यात आले आहेत, तसेच सौर कुंपण तयार करण्यात आले आहे.

• Rescue Team तयार करण्यात आली आहे.

• मानव वन्यप्राणी संघर्ष रोखण्याच्या दृष्टीने वनअधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येते.

• वनांवरील अवलंबन कमी करण्याच्या दृष्टीने सबसिडीवर एलपीजी गॅस शेगडी व सिलेंडर पुरवठा केला जात आहे.

परिक्षेत्र स्तरावर क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत नियमित गस्त करण्यात येते.

---

## शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ११० हेक्टर वनजमिनीवर लॅटराईट उत्खननास परवानगी देण्याबाबत

**(४८) १०१३४६ (२६-१२-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील शाहुवाडी तालुक्यातील घुंगुर, परळी, परखंदळे, सावर्डे खु., आंबर्डे या गावांच्या सुमारे ११० हेक्टर वनजमिनीवर लॅटराईट खाणाचे काम करण्याचा संकल्प आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाच्या वन व महसूल विभागाच्या दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ च्या अधिसूचनेनुसार सदर खाण प्रकल्पातील वनजमीन राखीव वने म्हणून घोषित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तावित खान प्रकल्पाच्या वनजमिनीमध्ये वन्यजीव, पशुपक्षी, जलचर प्राणी, सरपटणारे जीव, जंगली श्वापदे व विविध प्रकरचे कीटक आढळतात हे वन विभागाकडून बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात टिपले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास सदर खान प्रकल्पाच्या वनजमिनीमधून सभोवतालच्या जवळपास २० गावांना नैसर्गिक पाण्याचा झराच्या माध्यमातून ग्रामपंचायती मार्फत पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केल्या असून सध्या या योजना सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास प्रस्तावित खान प्रकल्प परिसरात वनतळी, पाझर तलाव, व सिमेंट बंधारे बांधले असून त्याचा वापर प्राण्यांना पाणी पिण्यासाठी होत आहे व त्याच परिसरात औषधी वनस्पती आढळतात, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास शाहुवाडी तालुक्यातील वनजमिनीवर लॅटराईट उत्खननास परवानगी दिल्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होवून वन्य प्राण्यांना होणारा त्रास व वनजमिनीवरील लॅटराईट उत्खनन परवाना रद्द करणेबाबत शासन तातडीने कार्यवाही करणार आहे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-०२-२०१८) :** (१) कोल्हापूर जिल्ह्यातील शाहुवाडी तालुक्यातील मौजे-घुंगुर, परळी, सावर्डे बु., अंबार्डे येथील ५९.९७ हेक्टर वनक्षेत्रावरील खाणप्रकल्पाबाबतचे प्रस्ताव वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाची पूर्व परवानगी घेण्याकरीता राज्य शासनास प्राप्त झाले आहेत.
(२) महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन अधिसूचना, दिनांक २९/०९/२०१७ नुसार शाहूवाडी तालुक्यातील ७५ गावांमधील २४२०२.२६ हेक्टर क्षेत्र राखीव वने म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यामध्ये प्रस्तावित खाण प्रकल्पांतील मौजे-घुंगुर व मौजे-परळी या गावांचा समावेश आहे.
(३) प्रस्तावित खाण प्रकल्प क्षेत्रामध्ये वन्यप्राण्यांचा आढळ दिसून आलेला नाही तसेच वनक्षेत्रामध्ये वनविभागामार्फत सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले नाहीत.
(४) प्रस्तावित खाण प्रकल्प क्षेत्रामध्ये कोणत्याही नैसर्गिक पाण्याचा स्त्रोत नाही. त्यामुळे पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रस्तावित खाण प्रकल्पाचे वनक्षेत्र हे खडकाळ व पठारी भाग असल्यामुळे या क्षेत्रात कोणत्याही प्रकारची वनतळी व पाझर तलाव नाही. तसेच वृक्ष गणनेवेळी कोणत्याही औषधी झाडांची नोंद दिसून आलेली नाही.
(६) वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत लॅटेराइट खनिजाच्या उत्खननाकरीता वनक्षेत्र वळती करणाचे प्रस्ताव केंद्र शासनाच्या पूर्व परवानगीकरीता राज्य शासनास प्राप्त झाले असून त्यांस अद्याप पर्यंत वन विभागाची परवानगी देण्यात आलेली नाही.

---

### मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील मोखाडा-नाशिक, जव्हार-खोडाळा रस्त्यालगत लावण्यात आलेली झाडे कोलमोडून गेल्याबाबत

**(४९) १०२२०१ (२६-१२-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या वन विभागाच्या "झाडे लावा, झाडे जगवा" या योजनेअंतर्गत मोखाडा तालुक्यातील (जि.पालघर) मोखाडा-नाशिक, जव्हार-खोडाळा रस्त्यालगत लावण्यात आलेली झाडे कोलमोडून गेली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार यांस जबाबदार असणाऱ्यांच्या विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०१-२०१८) :** (१) व (२) माहे नोव्हेंबर २०१७ व दरम्यान आलेल्या वादळाने व जोराच्या पावसामुळे वृक्ष संरक्षक कोलमडले होते. तथापि तात्काळ मजूर लावून वृक्ष संरक्षक सरळ करण्यात आले. वृक्ष संरक्षकाच्या आत लावलेल्या रोपांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही. आजमितीस सदर वृक्ष लागवडीचे काम चांगले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहेरी (जि.गडचिरोली) तालुक्यात जलयुक्त शिवार योजनेच्या ई-निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार**

**(५०) १०३०५५ (०६-०१-२०१८). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहेरी (जि.गडचिरोली) तालुक्यात जलयुक्त शिवार अभियान योजनेंतर्गत सन २०१६-१७ मध्ये उपविभागीय कृषि अधिकारी, कार्यालय अधिनस्त मृद व जलसंधारण कामाच्या ई-निविदा सूचना काढण्यात आल्या आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ई-निविदा प्रक्रिया राबविताना ३ निविदा सूचना मान्य करण्याचा नियम असताना केवळ आपल्या हितचिंतकांची निविदा पास करुन इतर सर्व निविदा रद्द करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एकच निविदाधारक पात्र असल्यास शासन निर्णयानुसार त्या निविदेला द्‌वितीय मुदतवाढ देणे क्रमप्राप्त आहे व त्यांनतर फेरनिविदा घेण्याचा शासन निर्णय असतांना त्या नियमांचे पालन करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर निविदा प्रकियेचा दुरुपयोग करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**प्रा. राम शिंदे (०७-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
जलयुक्त शिवार अभियान सन २०१६-१७ मध्ये तालुका अहेरी मधील सर्व कामे ई-निविदा पद्धतीने करण्यात आली आहेत.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.